सहायक कक्ष अधिकारी पदावरुन कक्ष अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्र.कअप-१२२५/प्र.क्र.९४/प्रशा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: - २३ फेब्रुवारी, २०२६

**आदेश**

मंत्रालयीन विभागातील खालील **सहायक कक्ष अधिकारी** [गट-ब (अराजपत्रित) वेतनश्रेणी एस-१६: रु.४४९००-१४२४००] यांना **कक्ष अधिकारी** [गट-ब (राजपत्रित) वेतनश्रेणी S-१७: रु.४७६००-१५११००] पदावर या आदेशाद्वारे विहित अटींच्या अधीनतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच सदर सहायक कक्ष अधिकाऱ्यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर **स्तंभ-६** मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | श्री/ श्रीमती | नाव | व्यक्तीचा प्रवर्ग | सध्याचा विभाग | पदोन्नतीनंतरचा विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | श्रीमती | स्वरुपा प्रशांत सावंत | खुला | जलसंपदा विभाग | **इतर मागास व बहुजन कल्याण विभाग** |
| २) | श्रीमती | विजया शांताराम साळुंके | इमाव | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | **शालेय शिक्षण व क्रिडा विभाग** |
| ३) | श्रीमती | श्वेता संजय राणे | खुला | वित्त विभाग | **वित्त विभाग** |
| ४) | श्रीमती | पुजा ज्ञानेश्वर देसाई | खुला | सार्वजनिक बांधकाम विभाग | **सार्वजनिक बांधकाम विभाग** |
| ५) | श्रीमती | प्रणाली प्रशांत सावंत | खुला | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग** |
| ६) | श्रीमती | अनुराधा दिपक कळविकट्टे | खुला | जलसंपदा विभाग | **नियोजन विभाग** |
| ७) | श्री | किरण पांडुरंग देशपांडे | खुला | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग** |
| ८) | श्री | प्रविण राजाराम खंदारे | खुला | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग** |
| ९) | श्रीमती | प्रविणा चेतन शेट्ये | खुला | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग** |
| १०) | श्री | सचिन दत्ताराम घाटावकर | खुला | कृषि व पदुम विभाग | **इतर मागास व बहुजन कल्याण विभाग** |

| अ. क्र. | श्री/ श्रीमती | नाव | व्यक्तीचा प्रवर्ग | सध्याचा विभाग | पदोन्नतीनंतरचा विभाग |
|---|---|---|---|---|---|
| ११) | श्री | पंढरी सखाराम सावंत | खुला | जलसंपदा विभाग | **नियोजन विभाग** |
| १२) | श्री | निलेश यशवंत तुरबाडकर | विमाप्र | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | **महिला व बाल विकास विभाग** |
| १३) | श्रीमती | सायली मुकुंद नेने | खुला | विधि व न्याय विभाग | **विधि व न्याय विभाग** |
| १४) | श्री | अहमद बाबुमियाँ शेख | खुला | सामान्य प्रशासन विभाग | **सामान्य प्रशासन विभाग** |
| १५) | श्री | संतोष रामचंद्र तळगांवकर | इमाव | महसूल व वन विभाग | **महसूल व वन विभाग** |
| १६) | श्री | गिरीष गणपत सुर्वे | इमाव | गृहनिर्माण विभाग | **गृहनिर्माण विभाग** |
| १७) | श्री | महेंद्र काशिराम मोरे | खुला | वित्त विभाग | **वित्त विभाग** |
| १८) | श्रीमती | गौरी राकेश नौकुडकर | खुला | महसूल व वन विभाग | **वित्त विभाग** |
| १९) | श्री | रमेश वामन सरफरे | खुला | सामान्य प्रशासन विभाग | **नगर विकास विभाग** |
| २०) | श्रीमती | पूजा प्रदिप वाघमारे | खुला | जलसंपदा विभाग | **नियोजन विभाग** |
| २१) | श्रीमती | शुभांगी राजाराम बाविस्कर | अज | वित्त विभाग | **वित्त विभाग** |
| २२) | श्री | विलास राघो भोगांवकर | इमाव | वित्त विभाग | **महसूल व वन विभाग** |
| २३) | श्रीमती | अनघा अनंत सावंत | खुला | वित्त विभाग | **वित्त विभाग** |
| २४) | कुमारी | सुरेखा शंकर सोनावणे | अजा | गृह विभाग | **गृह विभाग** |

**२. उपरोक्त सहायक कक्ष अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून कक्ष अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे:-**

१) **सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून तदर्थ स्वरुपातील पदोन्नती राहील.**

२) मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०४.०८.२०१७ रोजी पदोन्नतीतील आरक्षणाबाबत शासनाने निर्गमित केलेला दिनांक २५.०५.२००४ चा शासन निर्णय रद्दबातल ठरविला आहे. सदर निर्णयाविरुध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर तदर्थ पदोन्नत्या या राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहतील.

३) सदर तदर्थ पदोन्नत्या मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.१८९२/२०२४ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

४) सहायक कक्ष अधिकारी पदावरुन कक्ष अधिकारी पदावर प्रस्तावित सन २०२५-२६ ची निवडसूची तदर्थ स्वरुपाची असून सदर पदोन्नत्या ह्या तदर्थ स्वरुपाच्या आहेत. **परिणामी**

<u>निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमित पदाचा व सेवा ज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.</u>

५) सदर तदर्थ पदोन्नती प्रतिनियुक्तीवर बाहेर गेलेले अधिकारी रुजू होईपर्यत किंवा पदोन्नतीच्या आदेशापासून ११ महिन्यांसाठी यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी असेल.

६) सदर पदोन्नत्या तदर्थ स्वरुपाच्या असून त्या केवळ पदोन्नत कोट्यात उपलब्ध होणाऱ्या पदांनुसार नियमित करण्यात येतील.

७) सदर तदर्थ पदोन्नत्या दिव्यांग आरक्षणाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २९.०७.२०२४ मधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीनुसार होणाऱ्या बदलाच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

८) संबंधित सहायक कक्ष अधिकारी यांनी कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/कार्यासन-१२, दिनांक १२.०९.२०१६ व सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दिनांक ०१.०८.२०१९ मधील तरतूदीनुसार संबंधित अधिकाऱ्याचे नांव सन २०२५-२६ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल आणि पुढील दोन वर्षी (**सन २०२६-२७ व २०२७-२८**) होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत (**सन २०२८-२९**) कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

९) सदर अधिकाऱ्यांची कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती ही सदर अधिकाऱ्यांविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने याबाबतची खातरजमा करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु वा प्रस्तावित असल्यास या विभागास अवगत करावे.

१०) पदोन्नत अधिकाऱ्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून **तीस दिवसांमध्ये** कक्ष अधिकारी पदावर रुजू होणे आवश्यक आहे. पदोन्नत अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने विहित मुदतीत कार्यमुक्त करावे.

११) संबंधित विभागांनी पदोन्नत अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केलेल्या व कक्ष अधिकारी पदावर रुजू करुन घेतलेल्या आदेशाच्या प्रती **साप्रवि/प्रशा-२** कार्यासनास तात्काळ पाठविण्यात याव्यात.

**३.** महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (कालबध्द प्रशिक्षण) नियम, २०२२ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे संबंधित पदोन्नत अधिकाऱ्यांवर बंधनकारक राहील.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०२२३१८११२७९५०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMAKANT JADHAV

Digitally signed by VIVEK RAMAKANT JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=0c6f092192cae76ac289eef2587c5f28373c6e445e4552e27b340b424d48717c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F960CA130E1B6E0A979CBB41C7516CA46961184AD1E4ECE1A118390C02E6745E, cn=VIVEK RAMAKANT JADHAV
Date: 2026.02.23 18:12:22 +05'30'

( वि. र. जाधव )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संबंधित सहायक कक्ष अधिकारी **(संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)**

**प्रत,**

१) अ.मु.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व संबंधित मंत्रालयीन विभाग (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)
३) सह सचिव/उप सचिव (आस्थापना), सर्व संबंधित मंत्रालयीन विभाग
४) कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-सेवा-१/२/३ (१२), प्रशा-१ व प्रशा-३
५) निवड नस्ती/प्रशा-२